आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२५ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

राज्यातल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून ३टक्के वाढ

स्त्री भ्रूणहत्या विरोधी कायद्यातल्या त्रुटी दूर करुन ते कठोर करण्याचं आरोग्यमंत्र्यांचं विधानसभेत  आश्वासन.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं आरोग्य मेळ्याचं उद्घाटन

**आणि**

मुंबई महापालिकेचा ८० हजार ९५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीसमोर सादर

**<><><><><>**

राज्यातल्या शासकीय आणि इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै 2025 पासून 3 टक्के वाढ करून 55 वरून 58 टक्क्यावर नेण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची घोषणा राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी विधानपरिषदेत केली. याचा फायदा 5 लाख16 हजार कार्यरत कर्मचाऱ्यांना, तर 8 लाख 72 हजार निवृत्त कर्मचाऱ्यांना होईल, अशी माहिती त्यांनी दिली. फेब्रुवारी 2026 पासून हा निर्णय लागू होईल, जुलै ते ऑक्टोबर 2025 ची थकबाकी गुढीपाडव्यानिमित्त मार्च 2026 मध्ये दिली जाईल, तर नोव्हेंबर 2025 ते जानेवारी 2026 च्या थकबाकीबाबत वेगळा आदेश निर्गमित केला जाईल, असं त्यांनी सांगितलं.

शिवशाही वाहनं वारंवार बिघडत असल्याने, तसंच प्रवाशांचा प्रतिसाद कमी असल्याने शिवशाही वाहनांचं रूपांतर निमआराम आणि साध्या वाहनांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती सरकारनं आज विधानपरिषदेत लेखी उत्तरद्वारे दिली. राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात स्वमालकीची 688 शिवशाही वाहनं असून जानेवारी 2026 मध्ये सरासरी 453 शिवशाही वाहनं धावत आहेत. या वाहनांचं आयुर्मान 10 वर्षांपेक्षा जास्त नाही, असंही सरकारनं स्पष्ट केलं.

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मूळ आरेखनामधे जायंट मीटरवेव्ह रेडिओ दुर्बिणीच्या अँटेनाला व्यत्यय येत असल्यामुळे केंद्र सरकारनं या मूळ मार्गाला आक्षेप घेतला असून सध्या हा विषय तिथेच थांबला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत दिली. या प्रकल्पाचा मूळ मार्ग बदलून तो शिर्डीमार्गे नेण्यासंदर्भात

आमदार सत्यजित तांबे यांनी प्रश्न उपस्थित केला. सरकारची भूमिका पूर्वीच्या आरेखनाला अनुकूल असून त्यात कमीत कमी बदल करावा या दृष्टीने तज्ज्ञांकडून पर्यायी आखणी करून घेऊ आणि त्यानुसार काम करू, असं आश्वासन त्यांनी दिलं.

मुंबईत सुरू असलेल्या सर्व बांधकामांवर देखरेख ठेवण्यासाठी इंटरनेट ऑफ थिंग्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने एक यंत्रणा तयार करण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिले आहेत असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. मुंबईतल्या वांद्रे शासकीय वसाहतीच्या जागेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीचं बांधकाम सुरु असून त्यात वायू प्रदूषण नियमावलीचं उल्लंघन होत असल्याबाबत अनिल परब यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर, या बांधकामावर कारवाई केल्याची माहिती पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. आमदार भाई शिंदे, शशिकांत शिंदे यांनीही या प्रश्नावरच्या चर्चेत भाग घेतला.

रायगड जिल्ह्यात खोपोली इथं मंगेश काळोखे हत्या प्रकरणात मकोका कायदा लावता येईल का, हे तपासून बघत आहोत, अशी माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज दिली. आमदार भाई जगताप यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयावर भ्रष्टाचारविरोधी पथकाने छापा टाकल्याचा मुद्दा सभागृहात चर्चेला घेण्याची सूचना फेटाळल्याची माहिती सभापतींनी दिली. याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. गदारोळातच सभापतींनी लक्षवेधी सूचना पुकारल्या. त्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला.

रोजगार हमी योजनेतल्या कोणत्याही रोजगार सेवकाला कामावरून कमी केले जाणार नाही, असं मंत्री भरत गोगावले यांनी आज विधानसभेत स्पष्ट केलं. मागणीनुसार काम देण्याचं धोरण कायम राहील आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही, असं ते म्हणाले. तसंच केंद्र सरकारकडून निधी मिळवण्यासाठी पाठपुरावा सुरू असून ही योजना अधिक सक्षमपणे राबवली जाईल. सर्व मजुरांचे पैसे देखील दिले जातील, असं आश्वासन मंत्र्यांनी सभागृहात दिलं.

रोजगार हमी योजना आणि घरकुल योजना यासंदर्भातल्या निधीसंदर्भात मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नाराजी व्यक्त केली. तसंच

यासंदर्भात पाठपुरावा करुन अधिवेशन काळात माहिती सभागृहासमोर ठेवण्याची सूचना केली.

**- - - बाईट - विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर - - -**

ऑनलाईन गेम्स आणि मोबाईलच्या व्यसनामुळे बालकांचं मानसिक, शैक्षणिक, सामाजिक आरोग्य धोक्यात आल्यासंदर्भात आमदार निरंजन डावखरे आणि संजय केणेकर यांनी लक्षवेधी सूचना मांडल्या. त्यावर, ऑनलाईन गेमिंगबाबत सरकार गंभीर असून त्यासाठी 2 फेब्रुवारी 2026 रोजी एक कृती दल स्थापन केल्याची माहिती, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिली.

याची व्यापकता वाढवण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची एक समिती स्थापन करण्याची घोषणा त्यांनी केली. पालकांना digital literacy आणि बालकांना digital diet गरजेचं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

चंद्रपूर जिल्ह्यातल्या एका शेतकऱ्याकडून कर्ज वसूल करण्यासाठी त्याला मूत्रपिंड विकायला लावल्याप्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करू असं आश्वासन गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधानसभेत सांगितलं. अतुल भातखळकर, विजय वडेट्टीवार, नितीन राऊत यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये हा मुद्दा उपस्थित केला. याप्रकरणी विशेष चौकशी समिती स्थापन केली आहे. याचा अहवाल आल्यानंतर चौकशी केली जाईल. पीडित शेतकऱ्याला सरकार शक्य ती मदत देईल असं भोयर यांनी सांगितलं.

मासिक पाळीच्या काळात महिलांना रजा मिळण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशानुसार एक समिती नेमण्यात येईल आणि त्यानुसार निर्णय घेतला जाईल असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत सांगितलं. जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. स्त्री भ्रूणहत्ये प्रकरणी सहाशे पेक्षा जास्त गुन्हे झाले आहेत, त्यासंदर्भात धडक मोहीम राबवून कठोर कारवाई केली जाईल असं आबिटकर यांनी सांगितलं. स्त्री भ्रूणहत्या विरोधी कायद्यातल्या त्रुटी दूर करुन ते कठोर करण्यासाठी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><><>**

आयुष उपचार पद्धतींना प्रोत्साहन दिल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते तसंच पर्यावरण रक्षणालाही हातभार लागतो, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. बुलढाणा जिल्ह्यात शेगाव इथं आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचं उद्घाटन केल्यानंतर त्या बोलत होत्या.

**- - - होल्ड - राष्ट्रपती बाइट - - -**

यावेळी त्यांनी आयुष उपचार पद्धतींचे फायदे आणि त्यांच्या प्रचार प्रसारासाठी सरकारकडून होत असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली.
राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी छोट्या छोट्या दुखण्यांसाठी घरगुती उपचार पद्धतीचा अवलंब करण्याचा तसंच व्यायामाचा सल्ला दिला.

आयुष पर्यटनावर भर देण्याची गरज केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केली.

या चार दिवस चालणाऱ्या या आरोग्य मेळ्यात आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी उपचार पद्धतीतला मोफत वैद्यकीय सल्ला, तपासण्या आणि औषधं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. मेळाव्यापूर्वी राष्ट्रपती मुर्मू यांनी शेगाव इथं संत श्री गजानन महाराज समाधीचं दर्शन घेतलं. संध्याकाळी राष्ट्रपती नागपूर इथं ब्रह्मकुमारी संस्थेच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसाच्या इस्रायल दौऱ्यासाठी आज रवाना झाले. या भेटीमुळे दोन्ही देशांतील दीर्घकालीन मैत्रीचे संबंध अधिक दृढ होतील, असं प्रधानमंत्र्यांनी दौरा सुरु करण्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. इस्राएलचे राष्ट्रपती आयझॅक हर्झोग यांची भेट प्रधानमंत्री घेणार असून इस्रायलमधील भारतीय नागरिकांशीही संवाद साधणार आहेत. इस्रायलच्या संसदेत प्रधानमंत्री मोदी यांचं भाषण होणार आहे.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाच्या ८६ हजार कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी महिन्याचा थकीत वेतनवाढीचा हप्ता देण्यात आला आहे. महामंडळानं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे २१० कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर १०० कोटी

रुपयांचा निधी तत्काळ उपलब्ध झाला. उर्वरित रक्कमही लवकरच प्राप्त होणार असल्याचं एस टी महामंडळानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

मुंबई महापालिकेचा ८० हजार ९५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आयुक्त भूषण गगराणी यांनी स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांच्याकडे आज सादर केला. चालू आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प साडे ७४ हजार कोटी रुपयांचा होता. मुंबई महापालिकेची राज्य सरकारकडे १० हजार कोटी रुपयांहून अधिक देणी शिल्लक असल्याचं अर्थसंकल्पात नमूद आहे. **यावेळी त्यांनी मुंबईत होत असलेल्या विविध कामांसाठीच्या तरतुदींची माहिती दिली.** अतिरीक्त एफएसआय, टीडीआर वगैरेसाठी आकारले जाणारं अधिमूल्य अडीच टक्क्यांनी वाढवण्याचा प्रस्ताव आयुक्तांनी अर्थसंकल्पात सादर केला आहे. सांडपाणी व्यवस्थापन, क्षार निर्मुलन प्रकल्पासाठी हरित रोखे आणण्याचा महापालिकेचा प्रस्ताव आहे. तसंच पायाभूत सुविधांचे रोखे ही महापालिका आणणार आहे.

**//<><><><><>//**